# पशुउपचारातील अंधश्रध्दा, चुकीच्या पद्धती व गैरसमजुतींचे निराकरण










**अखिल भारतीय समन्वित उस्मानाबादी शेळी सुधार प्रकल्प**
**पशुसंवर्धन विभाग**
**निंबकर कृषि संशोधन संस्था (नारी)**
**फलटण ४१५ ५२३ जि. सातारा**
**फोन ०२१६६ २६२१०६/२००७८३**
**ईमेल** nimsheep@gmail.com


NARi

भाकृअनुप
ICAR


Owbj २०१४

# पशुउपचारातील अंधश्रध्दा, चुकीच्या पद्धती व गैरसमजुतींचे निराकरण

## प्रस्तावना

पशुपालनातील काही व्यवस्थापन व उपचार पद्धती पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या आहेत. यांमध्ये कालमानानुसार बदल केले जात आहेत. परंतु उपचारांबद्दल पशुपालकांमध्ये आजही अनेक गैरसमजुती व चुकीच्या उपचार पद्धती आहेत. यामध्ये जनावरांच्या गळ्यात लिंबू, ताईत, देवाचा अंगारा बांधणे या पद्धती निरुपद्रवी आहेत. परंतु त्यांना कोणताही शास्त्रीय आधार नाही. योगायोगाने असे केल्यानंतर जर जनावर बरे झाले तर पुन्हा जनावर आजारी पडल्यावर शेळी–मेंढी पालक आपले जनावर पशुवैद्याकडे घेऊन जाणार नाहीत किंवा योग्य उपचार करणार नाहीत व एकप्रकारे अंधश्रध्देला खत–पाणी घातल्यासारखे होईल. जनावरांना डागण्यासारख्या काही पद्धती क्रूर व अमानुष आहेत. पाळीव जनावरे आपल्या आधीन असतात. ती मुकी असतात. बऱ्याच वेळा आजार बरे होणे तर दूरच परंतु चुकीच्या उपचार पद्धतींमुळे जनावरांचे हाल होतात. अशा उपचार पद्धतीने जनावरांना वेदना देणे हे पाप आहे. आधुनिक उपचार पद्धतींमुळे मानवाचे सरासरी आयुर्मान अलीकडच्या काळात खूपच वाढलेले आहे. मग पशूंच्या उपचाराबाबत आपण अजूनही एवढा मागासलेपणा का दाखवतो ?

जनावरांना वेदनाकारक, निरुपयोगी व चुकीच्या उपचार पद्धतींपासून पशुपालकांना परावृत्त करण्याच्या दृष्टीने हे माहितीपत्रक तयार केलेले आहे.

| अ. क्र. | आजार/ व्याधीचा प्रकार | अज्ञानातून वा अंधश्रध्देतून केले जाणारे उपाय व त्यांचे दुष्परिणाम |
|---|---|---|
| १. | जनावर सुधारत नाही, अशक्त, खाल्लेले अंगी लागत नाही. | **चुकीचे व निष्फळ उपाय :**<br>कोणाची तरी नजर लागली, देव घातला, काहीतरी देवाचे करायचे राहिले, करणी अशा समजुतीपोटी<br>१. जनावराच्या गळ्यात लिंबू बांधणे<br>२. गळ्यात हाड बांधणे<br>३. गळ्यात बिब्बा, कवडी बांधणे<br>४. नजर लागू नये म्हणून गळ्यात ताईत बांधणे<br>५. मांत्रिकाकडून अंगारा घेऊन त्याची पुरचुंडी गळ्यात कापडाने बांधणे.<br>**दुष्परिणाम :**<br>१. गळ्यात बांधलेला बिब्बा काही शेळ्यांना उततो व गळ्याला जखम होऊ शकते.<br>२. अंधश्रध्देचा परिपोष होतो. |
| २. | पोटफुगी, पोटात दुखणे (बोका येणे) | **चुकीचे व निष्फळ उपाय :**<br>१. चप्पल शेणाने भरवून त्याने जनावराच्या डाव्या कुशीवर शेणाचे पट्टे ओढणे.<br>२. जनावराच्या पोटात दुखत असल्यास चटणी, चटणी–भाकरी चारणे.<br>३. जनावर पोटदुखीची लक्षणे दाखवीत असल्यास त्याला लहान मुलांची लघवी पाजणे.<br>**दुष्परिणाम:**<br>१. शेणाच्या पट्ट्यामुळे घाण होते व माशा आकर्षित होऊन त्याचा जनावरांना त्रास होतो. काही वेळी माशा आसाडी सुद्धा घालू शकतात व मोठी जखम होऊ शकते.<br>२. चटणी चारल्याने जनावरांच्या जिभेचा व आतड्यांचा दाह होतो. काही वेळा अपचनसुध्दा होते. |

| व्याधीमागील शास्त्रोक्त कारण | व्याधीवरील शास्त्रोक्त उपाय |
|---|---|
| १. पुरेसे खाद्य न मिळणे: विशेषत: व्यायलेल्या व करडे/कोकरे पीत असलेल्या माद्या, वाढीच्या वयातील तरुण जनावरे यांच्याबाबतीत हे कारण असू शकते.<br>२. व्यवस्थापनच जर खराब असेल तर कोणतेही जनावर अशक्त होत जाणार व सुधारणार नाही.<br>३. गंभीर आजारामुळेसुद्धा जनावरे खराब होऊन बरेच दिवस अशक्त दिसतील. उदा. तीव्र जुलाब, जोन्स रोगासारखे काही आजार.<br>४. पावसाळ्यामध्ये ओलसरपणामुळे हिरवा चारा कमी खाल्ला जातो. तसेच जास्त प्रमाणात जंतप्रादुर्भाव जनावरे खराब होण्यास कारणीभूत होतो.<br>५. बाह्य परोपजीवी कीटक (गोचिड, पिसवा इ.) यांच्या प्रादुर्भावामुळे जनावरांचे रक्तशोषण होऊन जनावरे खराब होऊ शकतात. | १. जनावरांचे वर्गीकरण (वाढीच्या अवस्थेतील जनावरे, गाभण, व्यायलेली, आजारी) करून त्याप्रमाणे गरज असेल तड्ढा जनावरांना जादाचा पौष्टिक खुराक व चारा देणे गरजेचे आहे.<br>२. शेळी–मेंढीपालन व्यवस्थापनात गरजेप्रमाणे सुधारणा करावी.<br>३. योग्य त्या रोग निदान पद्धतीचा वापर. उदा. जोन्स रोग तपासणी व पशुवैद्याच्या सल्ल्याने उपचार.<br>३. कळपात आंतरपरजीवी व बाह्य परोपजीवी कृमींचा प्रादुर्भाव असल्यास वेळच्यावेळी त्यांच निर्मूलन करावे. |
| १. भरपूर प्रमाणात हिरवा चारा खाण्यात आल्यामुळे<br>२. बुरशीयुक्त चारा खाण्यात आल्यामुळे मोठ्या प्रमाणात पोट फुगणे किंवा खाल्लेला चारा तसाच पोटात राहून चाऱ्याचा रेच बसणे व रवंथ क्रिया बंद होणे. | १. घरगुती उपाय म्हणून सोडा, ओवा, दूध+गोडेतेल या रेचक औषधांचा वापर करावा.<br>२. तोंडात आडवी काठी बांधावी. (घोड्याच्या लगामाप्रमाणे) किंवा<br>३. ३–४ फोडी लोणचे फडक्यात गुंडाळून जिभेवर ठेवून दोरीने शिंगामागे बांधून चघळावयास देणे.<br>४. तज्ज्ञ पशुवैद्याकडून पोटफुगीचे प्रमाण पाहून त्यानुसार उपचार करावेत. |

| अ. क्र. | आजार/ व्याधीचा प्रकार | अज्ञानातून वा अंधश्रध्देतून केले जाणारे उपाय व त्यांचे दुष्परिणाम |
|---|---|---|
| ३. | किरळ लागणे | **चुकीचे व निष्फळ उपाय:**<br>१. मंत्र उच्चारून घेणे<br>२. मस्तकावर डागणे<br><br>**दुष्परिणाम:**<br>१. डागताना चुकून तापलेली सळई जोरात दाबल्यास मोठी जखम होऊ शकते व जनावरांना त्रास होतो. |
| ४. | लंगडणे, तलंगणे (चारी पायांनी लंगडणे) | **चुकीचे व निष्फळ उपाय :**<br>१. लंगडणाऱ्या पायाला मांडीला, नडगीला, खुराशेजारी डागणे<br>२. तलंगणाऱ्या जनावरांच्या पाठीवर व छातीखाली (उराडीला) डागतात.<br><br>**दुष्परिणाम:**<br>१. डागल्याने जखम होऊ शकते व जखमेत माशीने आसाडी घातल्याने जनावरांना त्रास होतो. |
| ५. | डोळ्यांचे आजार (चिपडणे, लालसरपणा, सुजणे, फूल पडणे) | **चुकीचे व धोकादायक उपाय :**<br>१. फुटक्या बशीचा बारीक कूट करून त्यामध्ये कुंकू मिसळून ती राळ डोळ्यामध्ये भरणे.<br>२. तंबाखू खाऊन त्याची पिचकारी डोळ्यात मारणे<br>३. हिंगणीच्या झाडाचा पाला चावून त्याची पिचकारी डोळ्यात मारणे.<br>४. डोळ्याखाली पापणीशेजारी डागणे.<br>५. रुई किंवा शेराचा चीक डोळ्यात घालणे.<br><br>**दुष्परिणाम:**<br>1. बशीच्या कुटामुळे डोळ्यास इजा होते.<br>2. डोळ्यात कुंकू, तंबाखू, हिंगणीचा पाला, रूई किंवा शेराचा चीक घातल्याने डोळे चुरचुरतात व डोळ्यांचा दाह होतो. |

| व्याधीमागील शास्त्रोक्त कारण | व्याधीवरील शास्त्रोक्त उपाय |
| --- | --- |
| १. कोवळी, न निसवलेली ज्वारीची धाटे किंवा कापून फुटवे फुटलेल्या ज्वारीच्या कोंबात हायड्रोसायनिक आम्ल (कउछ) असते. अशाप्रकारचा ज्वारीची धाटे जास्त प्रमाणात खाण्यात आल्यावa विषबाधा होते. | १. कोवळी किंवा खोडव्याच्या ज्वारीची धाटे जनावरांना खाऊ देऊ नयेत. दुसरा काही चारा उपलब्ध नसल्यास आदल्या दिवशी असा कोवळा चारा कापून किमान १२ तास सुकवावा म्हणजे त्यातील आम्लाची मात्रा कमी होईल.<br>२. तज्ज्ञ पशुवैद्यामार्फत विषबाधेवरील उपचार करावा. |
| १. पाय लचकणे, खुराला मार लागणे, खूर सुजणे, काटा मोडणे यामुळे जनावरे लंगडतात.<br>२. लांब अथवा उंचीवरून उडी मारल्याने किंवा जरब्यासारख्या आजारात जनावरे लंगडतात. | १. गरम वीट/वाळूचा जनावराला सोसेल त्याप्रमाणे हळूवार शेक देणे.<br>२. पशुवैद्याच्या सल्ल्याने इंजेक्शन देणे. |
| १. डोळ्यास काठीचा मार किंवा इतर कारणामुळे दुखावला गेल्यास<br>२. वैरण खाताना डोळ्याला चिपाड लागून अथवा माळात चरताना कुसळ अगर काटा गेल्यामुळे<br>३. अ-जीवनसत्वाची कमतरता, जीवाणू, विषाणूंचा संसर्ग इ. मुळे सुद्धा डोळ्यांचे विकार उद्भवतात. | १. प्राथमिक स्वरूपाचा उपाय म्हणून एक तांब्याभर थंड पाण्यात एक चिमूटभर बोरीक पावडर टाकून त्याने डोळे धुवावेत.<br>२. डोळ्यात सोडावयाच्या पातळ औषधांचा/मलमांचा वापर पशुवैद्याच्या सल्ल्याने करावा. |

| अ. क्र. | आजार/ व्याधीचा प्रकार | अज्ञानातून वा अंधश्रध्देतून केले जाणारे उपाय व त्यांचे दुष्परिणाम |
|---|---|---|
| ६. | जुलाब/डरंगळणे | **चुकीचे व निष्फळ उपाय:**<br>१. कापडी पट्टी शेणात किंवा चिखलात भरवून ती शेपटीभोवती घट्ट आवळतात.<br>२. मागील पायाच्या गुडघ्यांवरील शिरा कापडी पट्टीने करकचून बांधणे. (ढोणशीर आवळणे)<br>३. शेपटीच्यावर कंबरेशेजारी डागणे<br>**दुष्परिणामः**<br>१. शेणात किंवा चिखलात भरलेली कापडी पट्टी शेपटीभोवती बांधल्यामुळे शेपटी सुजते व कालांतराने शेपटीला गँगरीन होऊ शकते.<br>२. पायाला अशी पट्टी बांधल्याने रक्त पुरवठा बंद होऊन पाय सुजतो. |
| ७. | जखमा | **चुकीचे व निष्फळ उपाय:**<br>१. नुकत्याच झालेल्या जखमेवर रक्त वाहायचे बंद व्हावे म्हणून तंबाखूची मिश्री भरणे.<br>२. आसाडीच्या जखमांमध्ये आसाडी काढण्यासाठी डांबर गोळी भरणे.<br>३. आसाडी काढण्यासाठी फिनेल, गोचिडा मारण्याचे औषध (ब्यूटॉक्स), एन्ड्रीन, मेडीक्लोर, जळके तेल, राख किंवा रॉकेल ओतणे. (लहान जंतू, पिकावरील रोगजंतू मरतात त्यामुळे जखमेतील आळ्या मारायला चांगले या गैरसमजुतीपोटी ही औषधे वापरली जातात. परंतु कीटकनाशके किंवा डांबर गोळी व फिनेलमुळे जखम बरी होण्यास विलंब होतो किंवा काहीवेळा विषबाधा सुध्दा होते.)<br>**दुष्परिणामः**<br>१. डांबर गोळी, तंबाखू, रॉकेल यामुळे जखम चिघळते व जनावरांना त्रास होतो. |
| 8. | मान ओवाळणे | **चुकीचे व निष्फळ उपाय:**<br>१. दोन्ही शिंगांना दोरीने नट–बोल्ट बांधणे जेणेकरून शेळी ङ्गान हलवू लागली तर तिला बोल्ट लागतात व ती मान ओवाळू शकत नाही.<br>दुष्परिणामः<br>१. मूळ रोगाचा उपचार होत नाही व शेळीला निष्कारण त्रास होतो. |

| व्याधीमागील शास्त्रोक्त कारण | व्याधीवरील शास्त्रोक्त उपाय |
|---|---|
| १. जास्त प्रमाणात कोवळा व लुसलुशीत चारा खाण्यात आल्यामुळे<br>२. बुरशीयुक्त व ओला चारा खाण्यात आल्यामुळे<br>३. खाद्य व पाण्यातील अमीबासारखे एकपेशीय जीवाणू व विषाणूंमुळे जनावरांना जुलाब होतात.<br>४. आंत्रविषार, पी.पी.आर, घटसर्प, विषबाधा, यासारख्या आजारांमध्ये जुलाब होतात. | १. जनावरांना स्वच्छ व ताजा चारा द्यावा.<br>२. बुरशीयुक्त, भिजलेला, कुबट चारा देऊ नये.<br>३. स्वच्छ व थंड पाणी गरजेनुसार द्यावे.<br>४. प्रथमोपचार म्हणून कळकाचा/सिसमचा पाला किंवा त्याचा रस पाजावा.<br>५. नेबलॉन पावडर, पेसुलीन/फेझॉल यासारख्या गोळ्यांचा वापर व गरज पडल्यास इंजेक्शने पशुवैद्याच्या सल्ल्याने द्यावीत.<br>६. आंत्रविषार, पी.पी.आर, घटसर्प रोगप्रतिबंधात्मक लसीकरण नियमित करणे. |
| १. जखमांच्या नियमित मलमपट्टीची काळजी न घेतल्याने जखमात पू होतो. घाणीमुळे माशा बसून आसाडी तयार होते व जखम लवकर भरून येत नाही. | १. नुकत्याच झालेल्या अथवा जुन्या जखमा स्वच्छ धुवून कोरड्या करून त्यांची नियमित मलमपट्टी केल्यास जखम बरी होण्यास मदत होते.<br>२. आसाडी बाहेर काढण्यासाठी कारल्याच्या पाल्याचा रस किंवा टरपेन्टाईनचा वापर करावा.<br>३. जखमा बऱ्या होण्यासाठी आयोडीन व झिंक ऑक्साईड पावडरचा मलम करून जखमेस लावावा. |
| १. लिस्टिरियोसिससारखा जीवाणू प्रादुर्भावाङ्ळे होणारा रोग. ह्या रोगामुळे मेंदूवर परिणाम होऊन त्यातून शेळी मान ओवाळायला प्रवृत्त होते. | तज्ज्ञ पशुवैद्याकडून दीर्घ परिणामी प्रतिजैविकाचे इंन्जेक्शन दिल्यास रोग बरा होऊ शकतो. / लक्षणे कमी होऊ शकतात. |

| अ. क्र. | आजार/ व्याधीचा प्रकार | अज्ञानातून वा अंधश्रध्देतून केले जाणारे उपाय व त्यांचे दुष्परिणाम |
|---|---|---|
| 9. | विषबाधा, उष्माघाताचा झटका, अर्धांगवायूचा झटका | **चुकीचे व निष्फळ उपाय:**<br>१. विषारी रक्त वाहून जावे म्हणून कानांची टोके कापून रक्त वाहून जाऊ देणे.<br>२. झटका आल्यानंतर शांत होण्यासाठी कानाची टोके कापून त्यातून निघणारे रक्ताचे थेंब डोळ्यात सोडणे.<br>**दुष्परिणाम:**<br>१. विषारी रक्त वाहून जाते ही संकल्पना चुकीची आहे.<br>२. कानाची टोके कापून रक्त वाहते त्यामुळे पंडू रोग होतो. रक्तस्त्राव न थांबल्यास जनावर दगावू शकते. |
| 10. | भेदरा उतरणे (ऑर्कायटिस) | **चुकीचे व निष्फळ उपाय:**<br>१. अंडकोष सुजलेल्या ठिकाणी डागणे<br>२. सुजलेल्या भागावर ठिकठिकाणी बिब्बा लावणे<br>३. सुजलेल्या जागेवर टेरामायसिन इंजेक्शन किंवा सूज कमी होण्याचे इंजेक्शन टोचणे.<br>**दुष्परिणाम:**<br>१. बिब्बा उततो व जखमा होऊ शकतात.<br>२. डागल्यामुळे जनावरांना त्रास होतो व मोठी जखम होऊ शकते. |
| ११. | नाकाडी | **चुकीचे व निष्फळ उपाय:**<br>१. नाकाडीच्या जागी कौलाने घासणे<br>२. गोचिड मारण्याचे ब्युटॉक्स औषध, बी.एच.सी पावडर तशीच किंवा रॉकेल मध्ये मिसळून नाकाडीवर लावणे.<br>**दुष्परिणाम:**<br>१. कौलाने घासल्याने रक्त येते व मोठी जखम होऊ शकते.<br>२. ब्युटॉस व बी.एच.सी.मुळे विषबाधा होऊ शकते. |
| १२. | शेपटीला भेरूड होणo (Gangrene of tail) | **चुकीचे व निष्फळ उपाय:**<br>१. भेरूड झालेल्या ठिकाणी बोरीचा / बाभळीचा काटा खोचणे<br>२. भेरूडाच्या जागेवर गरम डांबर ओतणे.<br>**दुष्परिणाम:**<br>१. काटा खोचल्याने जनावरांना दुखते व तेथील जागा सुजून मोठी जखम होऊ शकते. गरम डांबर ओतल्याने दाह होतो. |

| व्याधीमागील शास्त्रोक्त कारण | व्याधीवरील शास्त्रोक्त उपाय |
| --- | --- |
| १. विषबाधेमध्ये किंवा अर्धांगवायूच्या झटक्यामध्ये मज्जासंस्थेवर नियंत्रण न राहिल्याने संपूर्ण शरीरावर जनावराचा ताबा राहत नाही. विषाची तीव्रता जेवढी जास्त तेवढ्या जलद गतीने स्नायूंवरील ताबा सुटून जनावर खाली पडते. | १. प्राथमिक उपाय म्हणून जनावर सावलीत घेऊन जावे. त्याच्या डोक्यावर थंड पाणी ओतावे व त्याला शांत करण्याचा प्रयत्न करावा.<br>२. प्रत्येक झटक्याशी व विषबाधेशी संबंधित वेगवेगळे उपाय आहेत. शक्यतो हे उपचार तज्ज्ञ पशुवैद्याच्या सल्ल्याने करावेत. |
| १. अंडकोषाला मार लागल्यास<br>२. ब्रुसेलोसिस सारख्या संसर्गजन्य आजारामुळे बाधित नरांमध्ये हे लक्षण आढळते.<br>३. जीवाणूंच्या प्रादुर्भावामुळे (अंडकोषाला जखम असेल तर जखमेतून प्रादुर्भाव झाल्याने) | १. वारंवार गाभडणाऱ्या शेळ्यांना माजावर आल्यानंतर बोकड भरल्यास कदाचित तो बोकड 'संसर्गजन्य गर्भपात' या आजाराने बाधित होऊन त्याचे अंडकोष सुजू शकतात. त्यामुळे बोकडाचा अशा शेळ्यांशी संपर्क येऊ देऊ नये.<br>२. अंडकोष सुजल्यास तज्ज्ञ पशुवैद्याकडून उपचार करून घ्यावेत. |
| १. नाकाडी हा बुरशीजन्य आजाराचा प्रकार असून त्यामुळे नाक, कान यावरील केस जाऊन त्या ठिकाणी जनावराला खाज सुटते व जनावर बेचैन होते. | १. नाकाडीसाठी धान्याला लावण्याची गंधक पावडर एक भाग व व्हॅसलीन किंवा करंजतेल चार भाग एकत्र घेऊन पिवळे मलम तयार करावे व ते सकाळ संध्काकाळ नाकाडीवर चोळावे. आठ ते दहा दिवस सलग लावल्यास नाकाडी पूर्ण बरी होते. |
| १. काही अपघाताने शेपटीच्या टोकाकडील हाडाला ङ्कार / दाब बसल्याने तेथील स्नायूंचा रक्तपुरवठा बंद झाल्याने मांसल भाग निर्जीव होतो व काही काळाने गळून पडतो. | १. तज्ज्ञ पशुवैद्याकडून शेपटीचा निर्जीव भाग कापून घ्यावा व तेथे नंतर नियमित मलमपट्टी करावी. |

# गैरसमजुती/अंधश्रध्दा यातून केले जाणारे इतर अघोरी उपाय

१. गोचिड, पिसवा मारण्यासाठी बी.एच.सी पावडर, रॉकेल चोळणे

२. शेळ्या–मेंढ्यांचे खूर सुजल्यावर त्यामध्ये ईकूसा नावाचा जंत असतो तो फार लांब खुरापासून गुडघ्यापर्यंत असतो असे समजून दोन्ही खुरांच्या मध्ये ब्लेडने कापणे व रक्त घालवणे किंवा नाचकण वापरून जंत बाहेर काढण्याचा (अयशस्वी) प्रयत्न करणे.

३. उपचारासाठी वापरत असलेली स्नायूत अथवा शिरेत टोचण्याची इंजेक्शने टोचण्याऐवजी तोंडावाटे पाजणे किंवा जखमेवर ओतणे.

४. इंजेक्शन टेरामायसीनला इंजेक्शन तेरामसी संबोधून हे इंजेक्शन तेरा प्रकारच्या आजारांवर गुणकारी आहे म्हणून सरसकट त्याचा वापर करणे.

५. दुधाळ जनावरांच्या बाबतीत वाईट विचाराच्या माणसाची नजर अशा जनावराला लागते. यामुळे जनावर लवकर आटते / कास जळते म्हणून गळ्यात बिब्बा, लिंबू बांधणे.

## सूचनाः–

१. शास्त्रोक्त पद्धतीने जनावरांना योग्य व आवश्यक उपचार केल्यास आजार त्वरित बरा होण्यास मदत होईल.

२. आजारामध्ये चांगल्या उपचाराबरोबर सकस आहार व खुराकाची जनावरांना आवश्यकता असते.

3. {वविध प्रकारच्या व्याधींमध्ये डागणे ही पद्धत वापरली जाते. काही अंशी दुखण्याची क्रिया कमी व्हावी म्हणून (र्लेींपींशी ळीीळींरींळेप) ठीक आहे. परंतु ही पद्धत क्रूर आहे. डागताना जनावरास खोलवर भाजण्याची जखम झाली तर त्याचा मोठा त्रास जनावराला होतो. त्यामुळे जनावरांना डागू नये.

४. पशूंच्या विशेषतः शेळ्या–मेंढ्यांच्या उपचाराबाबत बऱ्याचवेळा शेळी–मेंढीपालक औषधाच्या दुकानात जाऊन स्वतःच्या मनाने किंवा औषधविक्रेता देईल ते औषध विकत घेऊन उपचार करतात. त्यामधून अनेक वेळा पशुपालकाचे आर्थिक नुकसान होतेच. परंतु आजारपणसुद्धा बरे होत नाही. अशा वेळी गैरसमजुतीमधून केल्या जाणाऱ्या उपचारांना मोकळा मार्ग मिळतो. यासाठी तज्ज्ञ पशुवैद्याच्या सल्ल्याने पशुउपचार करावेत.

# निंबकर कृषि संशोधन संस्थेच्या पशुसंवर्धन विभागाकडील उपलब्ध सेवा

- अत्युच्च उत्पादनक्षमता असलेल्या उस्मानाबादी बोकडांचे ताजे व गोठविलेले वीर्य
- शेळ्यांचे कृत्रिम रेतन
- शेळ्या–मेंढ्या एका वेळी माजावर आणून कृत्रिम रेतनाचे तंत्रज्ञान
- पैदाशीसाठी जुळी कोकरे देण्याचा गुणधर्म असलेले बालिंगे (मेंढे)
- ईदसाठी, जत्रेसाठी व इतर वेळी मटणासाठी बोकड, बालिंगे व कोकरे
- शेळ्यांमधील व्यवस्थापन, कृत्रिम रेतन व प्रथमोपचार प्रशिक्षण वर्ग
- जंतप्रादुर्भावाचे प्रमाण पाहण्यासाठी शेळ्या–मेंढ्यांची लेंडी तपासणी
- शेळी–मेंढीपालनाबाबत सोप्या भाषेतील उपयुत पुस्तिका (मराठी, हिंदी व इंग्रजीमध्ये उपलब्ध)
- चाऱ्याचे बी व ठोंब
- शेळी–मेंढीपालन मार्गदर्शन व सल्ला

**पशुसंवर्धन विभाग**
**निंबकर कृषि संशोधन संस्था (नारी)**
**फलटण  ४१५ ५२३ जि. सातारा**
**फोन ०२१६६ २६२१०६/२००७८३**
**ईमेल** nimsheep@gmail.com